# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांकः- २३/०४/२०१८

## कसनासुर जंगल परिसरातील मृत माओवादयांची ओळख पटली

> मृतांमध्ये माओवादयांच्या दक्षिण विभागाच्या प्रमुखासह तीन दलम कमांडरचा समावेश

दिनांक २२ एप्रिल २०१८ रोजी महाराष्ट्र छत्तीसगड सीमेवरील इद्रावती नदीच्या तीरावर भामरागड तालुक्यातील मौजा कसनासुर जंगल परीसरात गडचिरोली पोलीस दलातील सी - ६० व सिआरपीएफ बटालीयन क्र. ०९ चे जवान नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना दबा धरुन बसलेल्या सुमारे ४० ते ५०. माओवाद्यांनी पोलीस पथकावर अंदाधुद गोळीबार केला प्रत्युत्तरासाठी व स्वसंरक्षणार्थ माओवाद्यांच्या दिशेने जवानांनी गोळीबार केला सुमारे १ ते १:३० तास सतत गोळीबार चालु होता त्यानंतर अचानक पणे गोळी बार थांबला. या नंतर सदर जंगल परीसरात शोध मोहीम राबविण्यात आली. या मोहीमे मध्ये १६ नक्षल मृतदेह मिळुन आले. या मध्ये ०९ पुरुष तर ०७ महीला मृतदेहांचा समावेश आहे. सदर मृतदेह दिनांक २३ एप्रिल रोजी सकाळी पोलीस मुख्यालय गडचिरोली येथे आणण्यात आले. १६ पैकी ११ मृतदेहाची ओळख पटविण्यात आली असुन इतर ०४मृतदेहांची ओळख पटविणे बाकी आहे. मृतांमध्ये नक्षलवाद्यांच्या दक्षिण भागाचा प्रमुख श्रीनु ऊर्फ श्रीकांत ऊर्फ रावतु विजेंद्र, वय ५० वर्ष, रा छल्लाग्रिग, मंडल चिट्याल, जि वरंगल (आंध्र) याच्यासह अहेरी दलम कमांडर, गट्टा दलम कमांडर, पेरमीली दलम कमांडर अश्या ०४ प्रमुख नक्षलवाद्यांच्या समावेश आहे. शासनातर्फे या १२ जणांवर एकुण रुपये ८२ लाख बक्षीस जाहीर करण्यात आले होते

| अ.क्र | माओवादयाचे नाव | कार्यरत दलम, पद व हत्यारे | बक्षीस | दाखल गुन्ह्यांची संख्या | मा. न्यायलयाने जाहीर केलेल्या जाहीरनाम्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | साईनाथ ऊर्फ डोलेश मादी आत्राम, वय ३२ वर्ष रा. गट्टेपल्ली ता. एटापल्ली जि. गडचिरोली | पेरमिली दलम डिव्हिसी/एके४७ | १६ लाख | ७५ | मा. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी अहेरी यांचे कडील २ तसेच मा. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी सिरोंचा यांचे कडील १ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | राजेश ऊर्फ दामा रायसु नरुटी, रा. मुरगाव, पोमके गट्टा (फु), ता. धानोरा, जि. गडचिरोली | स्टाफ टीम पिपिसीएम/८ एमएम | ४ लाख | २६ | मा. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी सिरोंचा यांचे कडील १ |
| ३ | सुमन ऊर्फ जन्नी कुळयेटी, वय १८ वर्ष, रा. पळतनपल्ली, पोमके ताडगाव, ता भामरागड, जि. गडचिरोली | प्लाटुन क्रमांक ०७ सदस्या/१२ बोअर | ४ लाख | १२ | |
| ४ | शांताबाई ऊर्फ मंगली पदा, वय ३१ वर्ष, रा गंगालुर, जि बिजापुर (छ.ग.) (पती डिव्हिसी श्रीनु दक्षिण डिव्हिजन सेक्रटरी) | अहेरी दमल कमांडर/ एसएलआर | ८ लाख | ९ | मा. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी सिरोंचा यांचे कडील १ |
| ५ | नागेश ऊर्फ दुलसा कन्ना नरोटे, वय ३२ वर्ष, रा. झारेवाडा, पोमकें गट्टा (जां.), ता.एटापंल्ली, जि. गडचिरोली | पेरमिली दमल एसिएम/.३०३ | ६ लाख | ७ | |
| ६ | तिरुपती ऊर्फ धर्मु पुंगाटी, वय २४ वर्ष, रा. केहकापरी, पोमकें ताडगाव, ता. भामरागड, जि. गडचिरोली | पेरमिली दलम सदस्य/ १२ बोअर | २ लाख | १ | |
| ७ | श्रीकांत ऊर्फ दुलसा ऊर्फ रानु नरोटे,वय २३ वर्ष, रा. मोरखंडी, पोस्टे बांदे, ता. पाखांजुर, जि. | पेरमिली दलम सदस्य/ १२ बोअर | २ लाख | ३ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | राजु ऊर्फ रमेश ऊर्फ नरेश कुटके वेलादी वय २९ पर्ष रा. झिजगाव, पोमके ताडगाव | गट्टा एलओएसक कमांडर एसएलआर | ८ लाख | १३ | |
| ९ | सन्नु ऊर्फ बिच्छु बोळका गावडे, वय ४४ वर्ष, रा. कोरेपल्ली उपपोस्टे राजाराम (खां.), ता. अहेरी, जि. गडचिरोली | प्लाटुन क्रमांक ०७ सदस्य/.३०३ रायफल | ४ लाख | | मा. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी अहेरी यांचे कडील १ |
| १० | श्रीनु ऊर्फ श्रीकांत ऊर्फ रावतु विजेंद्र, वय ५० वर्ष, रा छल्लाग्रिग, मंडल चिट्याल, जि वरंगल (आंध्र) | दक्षिण डिव्हिजन इंचार्ज/ एके ४७ | २० लाख | ८२ | मा. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी सिरोंचा यांचे कडील ५ |
| ११ | अनिता ऊर्फ बाली रामजी मडावी, वय २४ वर्ष, रा. करमपल्ली, पोस्टे - ता. भामरागड, जि गडचिरोली | पेरमिली दलम सदस्या / १२ बोअर | २ लाख | ४३ | |